## नियमीत दिवाणी दावा नं. ५०६/२०१२ मधील नि.५६ खालील आदेश
## CNR : MHSN06001830-2012
## (धोंडिराम बंडगर वि. उत्तम बंडगर आणि इतर)

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द करार पुर्तता होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ०२ श्री. अनिल सिद्राप्पा बंडगर हे दि.३०.०४.२०१९ रोजी शहापूर-इचलकरंजी येथे मयत झाले आहेत. सदरची माहिती ही वादी यांना दि. ०१.०७.२०१९ रोजी मिळाली. त्यावेळी वादी आजारी होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०२ यांच्या वारसांची नावे, पत्ते व दाखला मिळवण्यासाठी मिरज येथे आले परंतू त्यावेळी पुरामुळे, इचलकरंजीची वाहतूक बस सेवा बंद असल्याने तसेच इचलकरंजी नगरपालिकेतील स्वच्छतेच्या कामामुळे माहिती मिळू शकली नाही. वादी यांना दि.११.०९.२०१९ रोजी दाखला मिळाल्यावर अभिलेखावर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी पाच महिने, पाच दिवसांचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा त्यावेळची परिस्थिती नियंत्रणापलिकडची असल्याने झाला आहे. तसेच प्रतिवादी विरुध्द दावा अबेट झालेला आहे. न्यायाच्या दृष्टीने झालेला विलंब हा माफ होऊन, अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळावे अशी विनंती करतात.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, प्रतिवादी क्र. ०२ हे दि. ३०.०४.२०१९ रोजी मयत झाले आहेत. मुदतीच्या कायद्याचा विचार करता वादीने प्रतिवादी क्र. ०२ चे वारस दि. ३०.०७.२०१९ पुर्वी रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. सदर अर्जात नमुद केलेली वस्तुस्थिती चुकिची व दिशाभुल करणारी नमुद केली आहे. प्रस्तुत अर्जातील कारणे सकृतदर्शनी समाधानकारक नाहीत. त्यामुळे वादी यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती करतात.

**०३.** सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द हक्क ज्ञापनासाठी व मनाईसाठी दावा दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, वादीतर्फे सदरचा

अर्ज हा अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०२ श्री. अनिल सिद्राप्पा बंडगर हे दि.३०.०४.२०१९ रोजी शहापूर–इचलकरंजी येथे मयत झाले आहेत. त्यावेळी वादी आजारी असल्यामुळे, तसेच पुरामुळे, इचलकरंजीची वाहतूक बस सेवा बंद असल्याने तसेच इचलकरंजी नगरपालिकेतील स्वच्छतेच्या कामामुळे माहिती मिळू शकली नाही. सदरची माहिती ही वादी यांना दि. ०१.०७.२०१९ रोजी मिळाली. प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी पाच महिने, पाच दिवसांचा विलंब झाल्याचे तसेच सदरचा विलंब हा त्यावेळची परिस्थिती नियंत्रणापलिकडची असल्यामुळे झाल्याचे दिसून येत आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होऊन अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होऊन मिळावा अशी विनंती केली आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** वादीचा नि. क्र. ५६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** वादींच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.२२.०९.२०२२ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 22/09/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 22/09/2022 |
| Order uploaded on | : | 22/09/2022 |